# कार्यालयीन सुचना फलकासाठी

## सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांचे कार्यालय

## जाहीर सूचना

### आंतरराज्यीय मार्गांवर प्रवासी वाहतूकीसाठी स्थायी टप्पा वाहतूक परवाने जारी करण्यासाठी अर्ज मागविण्याबाबत

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य हयांच्या दि. ०१.१२.२००९ च्या बेठकीतील ठराव क्र.४५/२००९ अन्वये आंतरराज्यीय मार्गांवरील टप्पा परवाने सोडत पध्दतीने वितरित करण्याचा निर्णय घेतला होता. सदर परवाने जारी करण्यासाठी या कार्यालयामार्फत माहे जानेवारी २०१० मध्ये अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि, काही अर्जदारांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे वरील निर्णयास रिट याचिका क्र. ८१५ व ८६४/२०१० द्वारे आव्हान दिले होते. मा. न्यायालयाने या प्रकरणी दि. २१/०९/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाद्वारे राज्य परिवहन प्राधिकरणाचा उपरोक्त ठराव रद्दबातल घोषित केला आहे.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांनी ठराव क्र. २५/२०११ नुसार महाराष्ट्र व मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र व छत्तीसगढ राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतूक करारांर्तगत समाविष्ट असलेल्या विविध आंतरराज्यीय मार्गांवर प्रवाशी वाहतूक करण्यासाठी स्थायी टप्पा वाहतूक परवान्यांचे मंजूरी करिता **महाराष्ट्र राज्यातील इच्छुक वाहतूकदारांकडून दि. ३०.११.२०११ पर्यंत 'पीएसटीएसए' ह्या विहीत नमुन्यात व विहीत शुल्क रु. २००/- भरुन ह्याद्वारे नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

अर्जासोबत पुढील प्रमाणे कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील.

क) महाराष्ट्रामध्ये कमीत-कमी १५ वर्षे वास्तव्य असल्याचा पुरावा. (Domicile Certificate अधिवास प्रमाणपत्र)

ख) अर्जदाराचे चारित्र्य हे चांगले असून तो कुठल्याही गुन्ह्यामध्ये गुंतलेला नसल्याबाबतचे पोलिस स्टेशनचे प्रमाणपत्र. ( वैयक्तिक अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर अर्जदारांच्या बाबतीत चारित्र्य प्रमाणपत्राच्या ऐवजी चारित्र्याबाबत रु. १००/- एवढ्या मुल्याच्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र ( Affiidavitt ) विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापत्राचा नमुना राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी ह्यांच्या कार्यालयामध्ये तसेच परिवहन आयुक्त कार्यालयात उपलब्ध आहे)

ग) आंतरराज्यीय मार्गांवर सक्षम सेवा पुरविण्यासाठी अर्जदाराची आर्थिक स्थिती पुरेशी बळकट असल्याची खात्री करण्यासाठी अर्जदाराचे मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न किमान १२ लाख रुपये इतके असल्याबाबतचा पुरावा. (मागील ३ वर्षांचे आयकर विवरण पत्र / चार्टर्ड अकाउंटट चे प्रमाण पत्र) तसेच पॅनकार्डची प्रत सादर करणे आवश्यक राहील

घ) प्रस्तावित वेळापत्रक व भाडेपत्रक.

च) अर्जासोबत बिनव्याजी सुरक्षा ठेव म्हणून रू. १०,०००/- तसेच ज्या पात्र अर्जदारांना परवाना मंजूरीपत्र देण्यात येईल त्यांना परवान्यावर वाहन दाखल करतेवेळी अतिरिक्त बिनव्याजी सुरक्षा ठेव रु १५,०००/- रोख रक्कम किंवा सचिव,राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या नांवे काढलेल्या धनाकर्षाच्या (Demand Draft) स्वरुपात जमा करणे आवश्यक आहे.

छ) वाहन पार्किंगसाठी पुरेशी जागा असल्याचा पुरावा.

ज) अर्जदाराच्या व्यवसायाच्या जागेच्या/ पत्त्याचा पुरावा.

झ) प्रवाशांच्या सोयीसाठी प्रवासाच्या आरंभाच्या ठिकाणी वीज, पाणी, स्वच्छता व प्रवाशांचे सामान ठेवण्यासाठी जागा इत्यादी असल्या बाबतचा पुरावा.

त) अर्जदार हा अज्ञान किंवा मनोरुग्ण नसावा.